**कृपया प्रसिद्धीसाठी** **2 सप्टेंबर 2013**

## देशाची आर्थिक अराजकतेकडे वाटचाल - राम नाईक

**मुंबई, सोमवार :** ''जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत झालेली जबरदस्त वाढ ही देशाची आर्थिक अराजकतेकडे जाणारी वाटचालच आहे. डॉलर - रुपया विनिमय दराची रुपये 68.83 पर्यंत झालेली घसरण, सकल देशांतर्गत उत्पन्नाची (जीडीपी) एप्रिल - जून 2013 च्या तिमाहीची गेल्या 4 वर्षांतील 4.4 टक्के निचांकाची नुकतीच जाहीर झालेली वाढ, कच्च्या तेलाच्या (क्रुड ऑईल) आयातीची 70 टक्क्यावरुन 80 टक्क्यापर्यंत झालेली वाढ, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किमतीत झालेली वाढ ही देशाची आर्थिक स्थिती अतिशय कमजोर झाल्याची लक्षणे आहेत. अशा परिस्थितीत विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन ठोस उपाययोजना करण्याच्या ऐवजी भारतीय जनता पार्टीवर खापर फोडण्याचा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी केलेला केविलवाणा प्रयत्न म्हणजे 'नाचता येईना, अंगण वाकडे' या म्हणीचे नमुनेदार उदाहरण आहे. दुसरीकडे डॉ. मनमोहन सिंहांचे चौथे पेट्रोलियम मंत्री श्री. विरप्पा मोईली आयात कमी करायचा 'उपाय' म्हणून रात्रीच्या वेळी पंप बंद करायला निघाले आहेत. अशा निर्णयाने लोकांची गरज कमी कशी होणार, दिवसा पंपांवर काय गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल, याची कल्पनाही करता येत नाही, हे पेट्रोलियम मंत्री मूर्खांच्या नंदनवनातच वावरत आहेत'', अशी टीका भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबईत आज प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनात केले आहे.

जीवनावश्यक वस्तूंच्या मुंबईतील मे 2004 म्हणजे भाजपा सरकारच्या काळातील दरांची काँग्रेस सरकारच्या पहिल्या काळातील म्हणजे एप्रिल 2009 तसेच दुस-या काळातील म्हणजे 1 सप्टेंबर 2013 यांच्या तुलनात्मक किंमतीची आकडेवारीच श्री. राम नाईक यांनी आज प्रसिद्ध केली. त्यावेळी बोलताना ते म्हणाले, ''गव्हाचा 2004 मधील दर प्रतिकिलो रु. 9 वरुन सप्टेंबर 2013 मध्ये रु. 28 पर्यंत (211 टक्के वाढ), तर तांदुळ रु. 10 वरुन रु. 30 (200 टक्के वाढ) झाला आहे. डाळीमध्ये तुरडाळ रु. 30 वरुन रु. 80 (167 टक्के वाढ), मुगडाळ रु. 24 वरुन रु. 84 (250 टक्के वाढ), मसुरडाळ रु. 22 वरुन रु. 80 (264 टक्के वाढ), चणाडाळ रु. 25 वरुन रु. 56 (124 टक्के वाढ) तर गूळ रु. 14 वरुन रु. 55 (293 टक्के वाढ) असा झाला आहे. रोज लागणा-या भाज्यांचे दर आहेत :- कांदा रु. 6 वरुन रु. 70 (1067 टक्के वाढ), बटाटा रु. 8 वरुन रु. 22 (175 टक्के वाढ) तर टोमॅटो रु. 9 वरुन रु. 30 (233 टक्के वाढ). याशिवाय रोजच्या चहासाठी लागणारी चहापावडर रु. 80 वरुन रु. 300 (275 टक्के वाढ), साखर रु. 14 वरुन रु. 38 (171 टक्के वाढ), तर दूध प्रति लिटर रु. 14 वरुन रु. 44 (214 टक्के वाढ) असे झाले आहेत. पेट्रोलियम पदार्थांचे दर आहेत :- डिझेल रु. 22.50 प्रतिलिटर वरुन रु. 58.86 (162 टक्के वाढ), पेट्रोल रु. 33.15 वरुन रु. 81.57 (146 टक्के वाढ) तर स्वयंपाकाचा गॅस रु. 244 प्रति सिलेंडर वरुन अनुदानाचा सिलेंडर रु. 448.50 (84 टक्के वाढ) तर विनाअनुदान सिलेंडर रु. 858 (252 टक्के वाढ). याशिवाय पेट्रोलियम मंत्री श्री. विरप्पा मोईली यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून पुढील दरवाढीचे सुतोवाच केले आहे, त्यामध्ये पेट्रोल रु. 2, डिझेल रु. 3 ते 5 तर गॅस सिलेंडरमध्ये रु. 50 ची वाढ सुचविली आहे''.

..2..

‘‘जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीतील वाढीला रुपयाच्या अवमूल्यनामुळे जबरदस्त फटका बसला आहे. डॉलर - रुपया विनिमयाचा दर 2004 मध्ये रु. 45.10 होता तो आता 68.83 पर्यंत म्हणजेच 53 टक्क्यांनी घसरला आहे. हा ऐतिहासिक विक्रमी निचांक असून सध्या देशाची आयात निर्यातीपेक्षा जास्त होत असल्याने रुपयाच्या अवमूल्यनाचे हादरे भारतीय अर्थव्यवस्थेला बसत आहे’’, असेही श्री. राम नाईक म्हणाले.

‘‘कच्च्या तेलाची (क्रुड ऑईल) आयात 70 टक्क्यावरुन 80 टक्क्यावर गेली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाची किंमत खूपच वाढली आहे. गेल्या 10 वर्षात पेट्रोलियम संबंधी योग्य धोरण अमलात न आणल्यामुळे देशांतर्गत क्रूड ऑईल आणि नैसर्गिक वायु यांच्या उत्पन्नामध्ये भरीव वाढ झालेली नाही, तसेच वाजपेयी सरकारच्या काळात इथेनॉलचा पर्यायी इंधन म्हणून सुरु केलेला उपयोग कॉंग्रेस सरकारने बंदच पाडला आहे. या सर्व परिस्थितीमुळे किंमत वाढीच्या दुष्टचक्राची गती फारच वाढली आहे. अशा गंभीर परिस्थितीत कॉंग्रेसच्या आर्थिक धोरणाला अर्धांगवायू झाला आहे हे स्पष्ट आहे. आर्थिक अराजकतेकडे सुरु झालेली ही वाटचाल थांबविण्यासाठी भारतीय जनता पार्टीने संघर्षाची हाक दिली आहे. त्याला जनतेने प्रतिसाद द्यावा’’, असे आवाहनही श्री. राम नाईक यांनी पत्रकाच्या शेवटी केले आहे.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : किंमत वाढीचे पत्रक.**

# भारतीय जनता पार्टी, मुंबई

## *जीवनावश्यक वस्तूंच्या मुंबईतील किंमती*

**(संकलक श्री.राम नाईक, श्री. गिरीधर साळुंके)**

| वस्तू | भाजपा सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) मे 2004 | पहिल्या काँग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) एप्रिल 2009 | दुसऱ्या काँग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) 1 सप्टेंबर 2013 | 2004 च्या तुलनेत वाढ (%प्रतिशत) |
|---|---|---|---|---|
| गहू | 9 | 20 | 28 | 211% |
| तांदूळ | 10 | 22 | 30 | 200% |
| साखर | 14 | 23 | 38 | 171% |
| चहा पावडर | 80 | 190 | 300 | 275% |
| खाद्य तेल | 40(प्रति लिटर) | 70(प्रति लिटर) | 78(प्रति लिटर) | 95% |
| डालडा | 40 | 60 | 80 | 100% |
| तूर डाळ | 30 | 100 | 80 | 167% |
| मुग डाळ | 24 | 54 | 84 | 250% |
| मसूर डाळ | 22 | 60 | 80 | 264% |
| चणा डाळ | 25 | 36 | 56 | 124% |
| गूळ | 14 | 32 | 55 | 293% |
| बेसन | 20 | 48 | 60 | 200% |
| बटाटा | 8 | 14 | 22 | 175% |
| कांदा | 6 | 16 | 70 | 1067% |
| टोमॅटो | 9 | 16 | 30 | 233% |
| दूध | 14 (प्रति लिटर) | 28(प्रति लिटर) | 44(प्रति लिटर) | 214% |
| केरोसीन | 18 (प्रति लिटर) | 25 (प्रति लिटर) | 50(प्रति लिटर) | 178% |
| स्वयंपाकाचा गॅस | 244 (प्रति सिलेंडर) | 312(प्रति सिलेंडर) | 448.50(प्रतिसिलेंडर)<br>* 858 (प्रतिसिलेंडर) **विनाअनुदान** | 84%<br>252% |
| पेट्रोल | 33.15 (प्रति लिटर) | 44.60(प्रति लिटर) | 81.57(प्रति लिटर) | 146% |
| डिझेल | 22.50 (प्रति लिटर) | 34.50(प्रति लिटर) | 58.86 (प्रति लिटर) | 162% |
| सीएनजी | 19.71(प्रति किलो) | 24.65(प्रति किलो) | 35.95(प्रति किलो) | 82% |
| **डॉलर $1** | **रु. 45.10** | रु. 50.05 | **रु. 68.83** | **53%** |

***विशेष :***

**1. 2012-2013 चे 'सकल देशांतर्गत उत्पन्न'(जीडीपी) 5 टक्के राहील असे भारत सरकारच्या सांख्यिकी संघटनेने जाहीर केले आहे. हा दर गेल्या 10 वर्षात सर्वात कमी असून जणू धोक्याची घंटीच वाजवित आहे. 31 ऑगस्ट 2013 रोजी एप्रिल-जून 2013 च्या तिमाहीचा दर 4.4 टक्के जाहीर झाला असून तो गेल्या चार वर्षातील नीचांक आहे.**

**2. या शिवाय डॉलर -रुपया विनिमय दर 2004 मध्ये रु. 45.10 होता तो आता रु. 68.83 म्हणजे 53 टक्क्यानी वाढला आहे. याचाच अर्थ आपल्याला आयात करताना 53 टक्के किंमत जास्त द्यावी लागत आहे. हा ऐतिहासिक विक्रमी नीचांक आहे. सध्या आपली आयात निर्यातीपेक्षा जास्त होत असल्याने रुपयाच्या अवमूल्यनाचा जोरदार फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसत आहे.**

**3. कच्च्या तेलाची (क्रूड ऑइल) आयात 70 टक्क्यावरुन 80 टक्क्यावर गेली आहे तसेच अंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाची किंमत खूपच वाढली आहे. त्यामुळे सर्वांगिण किंमत वाढीच्या दुष्टचक्राची गती फारच वाढली आहे.**